# लेखांक ५७.

श्री.

यादी पेठ नारायणपूर किले पुरंधर एथील सेटियापासी कागद साधनाचे आहेत एणेप्रमाणे.

वराता व पावत्या आहेत एणेप्रमाणे.

१ बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार यांची पावती माणकोजी बिन दतसेट सेट्या याचे नावे सु॥ मया व अलफ ११०० या सालची रु॥ ५० पैकी रु॥ ४९ पोता जमा छ ५ जिल्हेजची सिक्यानसी आहे सेटेपणाचे सेणीब॥ पावती आहे

५ राजद्वारचीं पत्रें.

१ राज्याभिषेक शके १० रुधिरोद्वारी सवत्सरे आश्विनबहुल द्वितीया गुरुवार दतसेटी सेटया याचे नावें

१ हिरोजी इदलकर याचे कर्ज ब॥ बाकी वोढत आहे त्यापे॥ कोंडाजी दामोदर सबनीस दि॥ फुटनाईक यास बा॥ मु॥ चे ऐवजी होन पातशाही १७ देविले असेत आदा करून जाब घेणे ह्मणौन सन अर्बा समानीन अलफ १०८४ छ १५ सवालची वरात सदरहू अन्वये

२ राज्याभिषेक शके १३ क्षयनाम संवत्सरे सन सबा समानीन अलफ १०८७ या सालच्या दतसेट सेटिया याचे नावे हिरोजी इंडलकर याचे कर्ज

कौल रयत जमा करून पेठेची आबादी करणे याविसी वगैरे.

१ नबाब इमाम बिरदीखान किलेदार याचा गोपाळसेट व जाऊजी चौधरी यांचे नावे + + + या सालाचा यास वर्षे सन ११८५ पावेतो ११७

१ कडतोजी बीन हिरोजी माहाजन व सेटिया याचे नावे ठाणेदाराचा सन सबैन अलफ १०७० या सालचा यास सन खमस समानीन मया व अलफ ११८५ या साल पावेतों वर्षे ११६

१ दामाजी रघुनाथ सरसुभेदार याचा दतसेटी बीन एलसेटीयाचे नावाचा सन समान समानैन अलफ १०८८ छ १६ जमादिलावलचा हकाविसी आहे यास सन खमस समानीन (मया व अलफ) पावेतो वर्षे ९७.

१ नारो यादव यांचा मोघम सेटे माहजन याचे नावें सन तिसैन अलफ १०९० छ ९ साबानचा त्यांत अन्वय की मानाजी बाधा याचे सेटेपण नसतां

व॥ हमी गोपाळ सेट सेटिया हुजूरदप्तरी वोढत आहे त्यापै॥ ह्मणोन

१ वैशाख शुद्ध द्वितीया भानुवासर ब॥ मु॥ मोरो भास्कर कारखाननीस किले सिहगड तकदमा होन प॥ १५ देविले असत आदा करणे पावल्याचा जाब घेणे या अन्वये छ ३० जमादिलोवलची वरात.

१ वैशाख शुद्ध ६ गुरुवासरे यात ज्याजती तुझा चुलता गोपाळसेट असे लिहिले आहे ब॥ देणे वर्षासन त्र्यबकदेव गोसावी किले राजगड यास तकदमा होन प॥ ७५ देविले ते आदा करून जाब घेणे याअन्वये छ ४ ज॥ खरची वरात.

२

३

२ राज्याभिषेक शके १३ क्षयनाम संवत्सरे सन सबा समानीन अलफ १०८७ या सालची गोपाळसेट सेटया याचे नावे वराता त्यात अन्यय कीं हिरोजी इंडलकर याज ब॥ कर्ज ब॥ हमी तुजकडे हुजूर दप्तरी वोढत आहे त्यापै॥ या अन्वये

१ माघ वद्य ६ भानुवासरे लोक दि॥ दंडपाणी सेवक याजकडील तकदमा होन प॥ १०० देविले असेत सदरहू ऐवज हुजूर पोहचऊन देणे या कामा ब॥ नफर दि॥ दंडपाणी होत

त्याणे कागद व तश्रीफ मोगलाचे तर्फेने घेतली या निमित्य त्याजला गुन्हेगारीचा खड रु॥ ३०० केला आणि हुजूर सालगु॥ वसूल घेतला असे त्यास तुह्मी एक रुका न देणे सुखरूप पेठेवरी राहुन उदीमव्यवसाय करीत जाणे या अन्वये त्यास खमस समानीन मया व अलफ या साल पावेतों वर्षे ९५.

रू १ मोघम कौल बावाजी बिन गोपाळसेट याचे नावें सन जलूसवाला सन १० दाहा यातील इस्तावियाचा आहे त्यास सन फसली सन ११९४ पावेतो जलुसवाला सन १३८ एकसे अडतीस होतात त्याची वर्षे ९५ याजवरून सदरहू कागदास जलुदसी सनानें वर्षे ११९

२ कौलनामा ह्मणोन मोघम जनकोजी प॥ व दतसेट याचे नावे सन फसली १०९९ व सन जलुसी सन ३३ छ १२ जिल्हेजचा आहे त्यास सन हाली फसली ११९४ पावेतो वर्षे ९५ व यावरून फसली सन ११९४ पावेतो जलुसी सन ९५ होतात.

१ मोघम कौल दतसेट सेटिया याचें नावें सन ११०१ यातील आहे त्यांत अन्वय की तुझें बाबे मोरो पडित गुमास्ते मालोजी नरसिगराव व गोविंदराव सितोळे देशमुख प्रा॥ पुणें

२ तुकोजी सिदा जथे संक्राजी नाईक पवार.
२ लखमाजी आउध जथे हरवाजी नाईक सिवदडा.
---
४

एकून होन ४ देविले असेत सदप्रो॥ आदा करणे या अन्वये छ ४ रबिलावलची वरात.

१ माघ बहुल ११ मंदवासर बदल देणे रदकर्ज नरससेट उधाप्पा बकाल पेठ पाचाड कर्ज जमा पेठा हाय नजीक रायगड बा॥ बखैर कारकून पेठ मा॥र छ २२ जमादिलावल तकदमा होन पा॥ ६० देविले असेत आदा करणे पावलियाचे जाब घेणे या अन्वये छ २४ जमादिलावलची वरात.

---
५

३ पेशवे यांच्या वराता व पावत्या

१ मोरो त्रिमळ व नारो नीळकठ याचा गोपाळसेट सेट्या याच्या नावे सन खमस सबैन १०७४ या सालचा त्यांत अन्वय कीं तुझा सेटेपणाचा निवाडा सेटेपण तुज करार करून सहजर तुजला दिल्हा याबद्दल संभाजीराजे साहेबास भेटी ठेविली होन ५ ठेविली ते मुकाम रायगडचे मोता जमा छ २५ जिल्हेज या अन्वये.

१ मोरो त्रिमळ च मोरो नीळकंठ याचे गोपाळसेट सेटया याच्या नावे त्यांत अन्वय की तुझा सेटेपणाचा निवाडा

एऊन विदित केलें कीं पेठ मजकूरचा कदीम सेटिया दससेटी आहे ऐसियास दरम्यान सिवसेटी व कृष्णाजी बांधा माहजन पेठमारी सेटेपणास भाडत आहे ह्मणोन बराये मालुमाती खातरेस आणून कौल दिल्हा असे तरी तूं आपली खातरजमा राखोन हुजूर एऊन मुलाजमाती करणे हक असेल तेणेप्रो॥ विल्हे लाऊन या अन्वयें छ २१ साबानचा आहे त्यास सन ११९४ पावेतो वर्षे ९३.

१ बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार याचा सन मया व आलफ या सालचा गौरोजी सेटिया याचे नावें त्यांत अन्वय कीं तुवा भेटीस यावयास मनांत दहशत धरिली ह्मणोन गोविंद कुलकर्णी एथे

एऊन सांगितले तरी तूं कोणें बाबें शक न धरितां भेटीस येणें तुझा मुद्दा असेल तेणेंप्रों पारपत्य होईल एविसी कौल असे या अन्वये छ ९ जमादिलावलचा आहे त्यास हाली सन खमस समानीन मया व अलफ या सालपावेतो वर्षे ८५.

रू सिवाजी माहाराज यांचा गोपाळसेटी सेटी याच्या नावें सन खमस सबैन अलफ १०७५ या सालचा यांत अन्वय कीं जाऊसेटी बिन कडतसेटी माहाजन पेठ मा॥र फिर्यादी जाला जे सेटेपण पेशजी बाजी बिन

करून सेटेपण पेठमजकूर हे तुझे तुज दुमाला महजर करून दिल्हा त्याजबा॥ सेरणी होन प॥ १५० तुज खंड केला त्यापै॥ पेस्तर साली द्यावे ह्मणऊन तहकूब केले होन ५० पन्नास बाकी साल मजकुरी वसूल द्यावे होन १०० हुजूर दिल्हे ते जमा पोते

| होन प॥ | रु॥ |
|---|---|
| ५० | १८७॥ |

एकूण पन्नास होन व एकसे साडे सत्याइसी रु॥ जमा पोते छ २५ जिल्हेज या अन्वये पावती सन खमस अलफ १०७४ या सालची.

१ नीळकंठ मोरेश्वर याचे दतसेट सेटया याचे नावे त्यांत अन्वय की तुजकडे हरकी बा॥ इमारती किले पुरधर बा॥ सेरणी बाकी वोढत आहे त्यापै॥ देणे बा॥ मु॥ शामजी केशव दफ्तरदार किले अहिवतगड होन प॥ २० वीस आदा करणे पावलियाचा कागद घेणे छ ९ जिलकाद सन सीत समानीन अलफ १०८६ या सालची सदरहू अन्वये बरात.

३

१ पावती दतसेट सेट्या याच्या नावे कोंडाजी भोले सरहवालदार इमारती किले पुरंधर याणे लेहून दिल्ही आहे ते सन सबा समानीन अलफ १०८७ या सालची त्यात अन्वय.

मावसेटी चालवीत होता तो मयत जाला आपण चालऊ लागलों व मलिकअबरी सनद आपणापासी आहे आणि हाली + + + + + ला आहे तरी निवाडा केला पाहिजे ह्मणोन त्यावरून मनास आणितां मावसेटी सेटेपण करीत होता तो तुझा चुलता त्याणे कमावीस केली मग तुझा पुतन्या तुकसेटी बिन रूपसेटी याने सेटेपण केले त्यावर तूं सेटेपण करतोस जावसेटीस सेटेपणास निसबती नाही चाकरी करीत आला + + + + पणाची केली व मलिकअंबराची सनद ह्मणतोस तेहि नाही मालुमाती + + राह जाली ते मामुरी करावयास आणिला आहे तेथे आपण सेटे व माहाजन लाविला आहे ते काही मनसुबी नव्हे पेशजी नेतोजी पालकर यांपासी जाऊन उभा राहिलास तेव्हां निवाडा ऐसाच जाहाला आहे व इमाम बिर्दी किलेदार मोगलाचे कारकीर्दीस आला होता ते वख्ती हि जाऊसेटी उभा राहिला तेव्हा हि ऐसाच + + + + हमशाही गोत व भले लोकाचे मते तैसेच निवडले की जावसेटीस निसबती नाहीं त्यावरून तुझे सेटेपण मिरास तुज मुकरार असे व तू व तुझी अवलाद मिरास सेटेपण पेठमजकूर देखील हकलाजिमा बरहुकूम भोगवटा व कमावीस करून खाऊन सेटेपणाची चाकरी व पेठमजकुरीची मामुरी करून असणे

१ छ २९ रबिलावलची आहे त्यांत अन्वय की तुझें व जावसेटी बाधा याचें सेटेपणाचें भांडण होतें त्याची मनसुबी रा। नेतोजी राजे पालकर हवालदार किले मजकूर याणी केली सेटेपण तुझें तुज देऊन सेरणी होन पन्नास बांधिली ते जमा धरून कारखाननिसीकडे बाकी बोढत होती त्यावर सन अर्बामध्ये किला मोगलास दिल्हा त्यावरी राजश्री कैलासवासी स्वामीनी किला मोगलापासून घेतला त्यावर अनाजी दतो सुरनीस यानी बाकी मनास आणून छ १९ जिल्हेज सन खमसामध्यें सनद बाकीची चालती केली ते पन्नास होन बाकीस होते त्यावरी सन सीतामध्यें हुजूर दफ्तरीहून वरात चालविली बित॥ होन.

३० बा। सनद राजाज्ञा बा। मु॥ नारो केशव दफ्तर-दार किलेहाय ब॥ सनद रा। पंतप्रधान.

२० शामजी केशव दफ्तरदार किले अहिवतगड.

५०

एकूण पन्नास होन तुजकडे त्याचा वसूल साल मजकुरी.

| होन | रुपये | टके खुर्दा |
|---|---|---|
| १३ | ७७॥ | १५४८६ |

जावसेटीस काहीं निसबती नाही व तुज हाली सेरणी एकसाला होन दीडसे करार केले सालमजकुरी एकसे होन पेस्तर सालीं होन पन्नास ऐसें पोता दाखल करणें पेस्तर सेरणीस निसबती नाहीं कौल असे ह्मणोन या अन्वये यास वर्षें सन खमस समानीन मया व अलफ या सालपावेतों. ११०

९

१ कित्ता पावती राज्याभिषेक शक १३ प्रभव नाम संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा गुरुवासर सन सबा समानीन अलफ १०८७ यास सन खमस समानीस मया व अलफ ११८५ या सालपावेतो वर्षे ९८ यांत अन्वय कीं दतसेट सेटिया यास आज्ञा ऐसी जे तुझा गोपाळसेट सेटिया याजवर हिरोजी इंदलकर याचे कर्ज होतें सबब की गोपाळसेट सेटिया व जाऊजी बाधा माहाजन पेठमजकूर या हरदोजणां मध्यें सेटेपणाबद्दल करकशा लागला होता ह्मणोन राजश्री स्वामीपासी मनसुभी होऊन सेटेपणास दूर जाला आपले सेटेपण आपले सभाळी केले गोपाळजी सेटियास हरकी होन पा। १५० माथा ठेविले त्याचा वसूल द्यावयास हिरोजी इंदलकर सुभेदार माजी इमारती किले रायगड याचे कर्ज घेतलें होन पा। १५५ ते देणे राहिले त्यास हिरोजी इंदलकरास दस्त केलें

सदर्हूप्रमाणे इमारत मजकुरी जमा जाले असत याअन्वये

० लग
१

१ दतसेट सेटया याच्या नावें बहिरो बाबाजी हवाले मोकदमी मौजे दौडज त।। नीरथडी प्र।। पुणें याणें सन इहिदे समानीन अलफ १०८१ छ १० जमादिलावलची दिल्ही आहे त्यांत अन्वय की तुह्मांकडे राजश्री हिरोजी इदलकर सुभेदार यांचे कर्ज आहे त्यानीं आह्मास पैके देविले आहेत त्यास तुह्मी आह्मास होन पा।। ३५ पसतीस व रु।। ५ पाच दिल्हे ते पावले आह्मी अखेरसाली रायगडास जाऊन कर्जपैकीं मजुरा देऊ या अन्वये.

११

ते समई त्याचे कागद सांपडले त्यामध्ये आपले नावें बनाय गोपाळसेट सेटिया ह्मणोन कर्ज होन पा।.

| | |
|---|---|
| बा।। खत | खेरीज कतबा |
| छ २२ जिल्हेज | छ २२ जिल्हेज |
| सन खमस | सन खमस |
| सबैन होन | सबैन |
| पा।। १०० | ५५ |

सदर्हू होन मुदल त्यास व्याज दर होनास दर माहे रुके ।।. प्रो त्यावर चौ महिनियानी छ २६ रबिलाखर सन सीत सबैनामध्यें हिरोजीस दिल्हे होन ५०।। पुढें द्यावयास अवकात नाही सबब सन तिसा त।। इहिदे वसूल दिल्हे होन ४२ दिल्हे त्यावरी हिरोजी दस्त जाला कर्ज दिवाणांत लागले ह्मणौन हुजूर विनति केली की आपली विल्हे केली पाहिजे. त्यावरून स्वामी कृपाळू होऊन तुझा हिसेब मनास आणून विल्हे केली बित।। ऐन मुदल व व्याज मिळोन १००६।।-।= याचा वसूल तुझ्यानें देववेना ह्मणौन चौघानी मनास आणून मख्ता केला होन ३५० पैकी वसूल हिरोजीस दिल्हे होन ९२।। व सन अर्बा समानीन होन ३६।।। ।÷ व सन खमस समानीन होन १० व सबा समानीन २१०।।।≡ ८÷ ए।। होन २५० सदर्हु प्रो। ३५० होन तुजपासून सदर्हु प्रो। ३५० होन तुजपासून घेतले असत हिरोजीचे कर्ज तुवा फारीख केल तुवा पेठेची सेटेपणाची चाकरी करून सुखरूप राहाणें या अन्वये छ २९ रबिलाखरची पावती सिकी निळकंठ मोरेश्वर यांची १

किता कागद

सन खमस सबैन अलफ १०७५ सालचें यास सन खमस समानीन मया व अलफ ११८५ पावेतो वर्षे ११० यांत अन्वय

छ २५ जिल्हेजचीं पत्रे.

बाजी घोलप हवालदार व कारकून किले पुरंधर यास मोरो त्रिमळ व नारो नीळकंठ याचा आहे त्यांत अन्वय कीं गोपाळसेट बिन नामसेट सेटिया याचा व जावसेटी महाजन याचा सेटेपणाबा कजिया होता त्यास राजश्री साहेब किलेमजकूरचे मुकामी होते तेव्हां जावसेटी फिर्याद जाला की सेटेपण आपलें यावरी गोपाळसेटीस आणून गोत मेळऊन मनसबी करितां सेटेपण गोपाळसेटीचें जालें जावसेटी उगाच लायेनी सेटेपणास झोंबतो त्याजला समध नाहीं ऐसें जालें त्यावरून राजश्री साहेबी सेटेपण गोपाळसेटीचें गोपाळसेटीच्या दुमाला करून कौल दिल्हा असे तरी तुह्मी पेठमजकुरीचे सेटेपण गोपाळसेटीचे दुमाला सालाबाद चालत आलें आहे तेणेप्रमाणें दुमाला करणें जावसेटीस निसबती नाहीं त्यास दखल होऊं न देणे कौलप्रमाणें गोपाळसेटीस महजर करून देणे हकलाजिमा सालाबादप्रमाणें दुमाला करणें तालीक लेहून घेऊन असल गोपाळसेटीस परतोन देणें या अन्वयें. १

गौरोजी गायकवाड हवालदार व कारकून इमारती किले पुरंधर यांस मोरो त्रिमळ व नारो नीळकंठ यांचे बाजी घोलप हवालदार यास पत्र आहे तें बाद केले आहे त्याप्रमाणेंच आहे दोन्ही पत्रांचा मजकूर एक आहे पत्र १.

बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार त्यांचा सिक्का गोल आहे त्यात अक्षरें एणें प्रमाणें.

श्रीउमाकांत पदांभोजभजनास-समुन्नते: ॥ बाळाजीविश्वनाथस्य मुद्रा भद्रा विराजते ॥

मोर्तबांत अक्षरे

मोर्तब सूद

छ २५ जिल्हेजचे संभाजी राजे यांचे नावे गौरोजी गायकवाड हवालदार व कारकून इमारती किले पुरधर यास आहे इ इ इ.